डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
फोन नं. २२८२६०२७ / २२८१७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक –क्र.क्रीडा/ 47 /२० दि. 28/12/ २०21

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– मुंबई विद्यापीठ बेसबॉल (मुली) शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या खेळाचे पात्रता पडताळणीचे रिपोर्टींग व निवड चाचणीबाबत.**

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाचा संघ हा पश्चिम विभागीय व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा २०२१–२२ मध्ये सहभागी होणार आहेत. वरील नमुद केलेल्या क्रीडा स्पर्धाची आंतर महाविद्यालय व आंतर विभागीय स्पर्धा न होता त्या खेळाची पात्रता पडताळणीचे रिपोर्टींग व निवड चाचणीकरीता वेळापत्रक पुढीलप्रमाणे घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | खेळाचे प्रकार | स्थळ | | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | बेसबॉल (मुली) | विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स | रिपोर्टींग | ३०/१२/२०२१ | सकाळी ११.०० वा. ते १.०० वा. पर्यंत |
| | | | निवड चाचणी | ३०/१२/२०२१ | दुपारी २.०० वा. |

आपल्या महाविद्यालयांमधील वरील खेळाचे निकष पूर्ण करणाऱ्या अशाच खेळाडूंना सोबत जोडण्यात आलेला फॉर्म, परिपत्रकानुसार शैक्षणिक कागदपत्रे, निकष पूर्ण करीत असलेली कागदपत्रे, ओळखपत्र व त्या खेळातील आवश्यक गणवेश घेऊन वेळेत उपस्थित रहावे. तसेच या निवडचाचणीसाठी होणारा खेळाडूसाठीचा खर्च विद्यापीठाकडून केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

वरील नमुद केलेल्या खेळाच्या रिपोर्टींगमधून संबंधित खेळाच्या सरावासाठी खेळाडूंची निवड करण्यात येईल व पश्चिम विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेपूर्वी खेळाडूंची अंतिम निवड चाचणी घेण्यात येईल.

धन्यवाद!

(डॉ. मोहन ना. आमृळे)
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण

**नोंद:– खेळाडूंनी स्वत: संबंधित खेळाचे साहित्य सोबत घेऊन येणे.**

सोबत:–
१) खेळातील निकष,
२) पात्रता (Eligibility),
३) पात्रता परिपत्रक
४) निवड चाचणीचे मार्गदर्शन सुचना,
५) हमी पत्र – विद्यार्थी, पालक व प्राचार्य.

Game / Event: ___________________

# University of Mumbai, Mumbai

INDIVIDUAL ELIGIBILITY PROFORMA

(Name of the College)

**(For the Players Participating in Inter-Collegiate, Inter-Zonal and Inter-University Tournaments for the Year 2021- 2022)**

1. (a) Name of the Player : ________________________________________
   (Beginning with Surname)
   (b) Name of the Mother : ________________________________________
   (c) Name in the Devnagari Script : ____________________________________
2. (a) Present Class : ________________________________________
   (Studying in the Name of the Faculty with Roll No.)
   (b) Class attended last year with name of the Institution / College & Faculty : ______________________________________
3. (a) Date of Birth : ____ /____ /________ (b) Phone no. :__________________
   (c) Local Address of Player : __________________________________________________________________
   ____________________________________________________________
   (d) Mobile No.: _________________________ (e) Email Id : - ____________________________________

| 4. Admission Details with Class | Name of the Institution / College | Month & Year of | |
|---|---|---|---|
| | | First Admission to | Passing |
| 1) XII[th] Std./ Diploma / Sr. Cambridge Exam. | | | |
| 2) F.Y. – B.A./ B.Com./ B.Sc./ | | | |
| 3) S.Y. – B.A./ B.Com./ B.Sc./ | | | |
| 4) Name of the Degree Course: | | | |
| i) | | | |
| ii) | | | |
| 5) Post Graduate Degree: | | | |
| 1st year | | | |
| 2nd year | | | |
| | | | |
| | | | |

**(Enclose Xerox copy of the documents for varification purpose as per office circular no.Sp./06 of 2019, dated 17.07.2019 properly attested by the Principal/ Vice-Principal/Office Superintendent or Registrar of the College)**

| 5. Participation Details | No. of Times & Years of Actual Participation | Game/Events |
|---|---|---|
| 1) Inter - Collegiate | | |
| 2) Inter Zonal | | |
| 3) Inter - University | | |

6. Other Information if any : ______________________________________________________

**DECLARATION :** I, the undersigned, regular student, do hereby solemenly declare that I am not employed either on whole time basis or part-time basis during this academic year.

``````````````````````!!!!!!!!!!!!!!!!``````````````````````!!!!!!!!!!!!!!!``````````````

Signature of the Player !!!!!!!!!!! | The Director, Physical Education | The Principal,

**CERTIFIED** that the above particulars are true as per office record.

Ebuf!;!````!0!````!0!```````

**Forwarded with compliments to;**
**The Director of the Sports & Physical Education,**
**University Board of Sports, University of Mumbai**
**University Sports Pavilion, Marine Lines, Mumbai – 400 020.**

**College Seal**
``````````````````````

# —: खेळातील निकष (सांघिक स्पर्धाकरीता) :—

➢ आंतर महाविद्यालय अथवा आंतर विभागीय स्पर्धा ह्या अडीअडचणीच्या परीस्थितीमध्ये अशक्य असल्यास विद्यापीठाचा संघ हा निवड चाचणीकडून निवडण्यात येईल. या निवड चाचणीमध्ये राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व विद्यापीठ खेळाडू यांनाच संधी देण्यात येईल.

— संबंधित खेळाडू हा खाली नमुद केलेल्या एकातरी स्पर्धेत सहभागी झालेला असावा तसेच त्याबाबत चे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

| अ.क्र. | क्रीडा प्रकार | ☑ याप्रकारे खुण करणे. |
|---|---|---|
| १) | संघटना राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा | ☐ |
| २) | शालेय राज्य क्रीडा स्पर्धा | ☐ |
| ३) | शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | ☐ |
| ४) | संघटनेच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | ☐ |
| ५) | आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा | ☐ |
| ६) | आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | ☐ |

________________
विद्यार्थ्याची सही

________________
संचालक,
शारीरिक शिक्षण व क्रीडा

________________
महाविद्यालयाचे प्राचार्य

मुंबई विद्यापीठ

डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
फोन नं. २२८२६०२७ / २२८१७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

---

जा.क्र.–क्र.क्रीडा/ /२० दि. / / २०

मा. प्राचार्य/मा. संचालक,
मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये
व मान्यताप्राप्त संस्था.

विषय:– मुंबई विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील होणाऱ्या क्रीडा स्पर्धा, निवडचाचणी च्या आयोजन व कोविड–१९ बाबत प्रतिबंधात्मक उपाय.

## अ) कोविड–१९ सामान्य प्रतिबंधात्मक उपाय :–

कोविड–१९चा धोका कमी करण्यासाठी खालील सार्वजनिक आरोग्य उपायांचे पालन केले पाहिजे (शारीरिक शिक्षण संचालक, खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक आणि स्पर्धेसाठी आवश्यक सर्व कर्मचारी) या ठिकाणी प्रत्येक वेळी:

१) शक्य तेवढे किमान ६ फुटांचे शारीरिक अंतर पाळावे.

२) मास्क/फेस कव्हरचा वापर करणे अनिवार्य आहे.

३) हात जरी स्पष्टपणे घाणेरडे नसले तरी साबणाने वा हॅन्डवाशने वारंवार हात धुणे (किमान ४०–६० सेकंदासाठी) अल्कोहोल आधारीत हॅन्ड सॅनिटायझर्सचा वापर (कमीतकमी २० सेकंदासाठी) शक्य असे तेथे करणे.

४) श्वसन शिष्टाचार काटेकोरपणे पाळले पाहिजेत. यामध्ये रडताना/शिंकताना टिश्यु/रुमाल/लवचिक कोपराने तोंड आणि नाक झाकणे आणि वापरलेल्या ऊर्तींची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे.

५) सर्वांनी स्वत:च्या आरोग्याचे स्वत: निरीक्षण करणे आणि कोणत्याही आजाराची लवकरात लवकर माहिती देणे.

६) थुंकण्यास सक्त मनाई आहे.

७) आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करणे आणि वापर शक्य असेल तेथे सल्ला दिला जाईल.

पान क्र. २

## अ) क्रीडा स्पर्धा प्रतिबंधात्मक उपाय :—

१) महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा विभागाशी संबंधित सेवक वर्ग यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले आवश्यक राहील.

२) सहभागी खेळाडूंचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले अनिवार्य राहील. लसीकरणाचे दोन डोस झालेले नसल्यास अशा खेळाडूस कोणत्याही स्पर्धेत सहभागी होता येणार नाही किंवा सहभागी करुन घेऊ नये.

३) लसीकरणाच्या मात्रा पूर्ण झालेले प्रमाणपत्र (Certificate for COVID-19 Vaccination – Fully Vaccinated: 2nd Dose) खेळाडूंना स्पर्धा पात्रता अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) निवडचाचणी/स्पर्धाकरीता वापरण्यात येणारे क्रीडा साहित्य व उपकरणे ही पुर्णत: सॅनिटाईज करुनच वापरात आणावीत. विना सॅनिटाईज क्रीडा साहित्य अथवा उपकरणांचा वापर करु नये. क्रीडा साहित्य व उपकरणे यांचा वापर केल्यानंतरही हात व साहित्य सॅनिटाईज करावे.

५) निवडचाचणी/स्पर्धे दरम्यान तसेच क्रीडांगणावर सोशल डिस्टसिंगचे (Covid Appropriate Behaviour) पालन बंधनकारक राहील.

६) क्रीडांगणावर निवडचाचणी/स्पर्धेसाठीचे पंच, ग्राउंडमन इ. यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

७) निवडचाचणी/स्पर्धामध्ये सहभागी असणाऱ्या खेळाडूंसाठी कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा पूर्ण व दुसरी मात्रा घेऊन १४ दिवस पूर्ण झालेले असणे आवश्यक राहील.

८) विद्यापीठाचे अंतर्गत होणाऱ्या सर्व निवडचाचणी/स्पर्धा ह्या सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०६ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या ब्रेक द चेन आदेशासोबत Standard Operating Procedure सहपत्रानुसारच होतील.

९) मैदानावर सॅनिटायझरची व्यवस्था करावी.

१०) खेळाडूंना वसतिगृहात निवासाची वेळ आल्यास एकुण ५० टक्के क्षमतेचे सर्व निकष पाळून निवास व्यवस्था करावी.

११) संघानी प्रवासादरम्यान सर्व कोविड–१९ च्या प्रोटोकॉलचे पालन करावे.

१२) खेळाच्या/प्रशिक्षण सुविधांच्या सामान्य क्षेत्रात प्रवेश देण्यापूर्वी खेळाडू आणि कर्मचाऱ्यांची तपासणी केली जाईल व त्यांनी लसीकरणाच्या दोनही मात्रा घेतली असणे आवश्यक असेल.

१३) निवडचाचणी/स्पर्धेदरम्यान खेळाडू/मार्गदर्शक/संघव्यवस्थापक यांनी निवासाचे ठिकाणी साबण, टॉवेल व इतर वस्तू हया स्वत:च्या स्वत: वापराव्यात. इतरांना वापर करण्यास देऊ अथवा घेऊ नये.

१४) निवडचाचणी/स्पर्धा आयोजनाबाबतचा तसेच दैनंदिन क्रीडांगणाचा वापर सुरू करणेबाबतचा निर्णय हा आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कोविड–१९ च्या प्रार्दुभावाचा आढावा घेऊन तसेच स्थानिक प्रशासनाची परवानगी घेऊन त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही अपेक्षित राहील.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

धन्यवाद! सहकार्याचे अपेक्षेत.

8/11/2021

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ